Panavtha




# महाबळेश्वरच्या जंगलात अशाही भट्टया पेटतात !

'पायलं या भडव्याची बदली करा. सस्पेंड करा. त्याशिवाय आमी इथून हलनार न्हाई' पाऊणशे बाया फॉरिस्टरेंजरला बजावीत होत्या. त्याला ऑर्डर काढायला लावून मगच त्या हलल्या. आता त्यानी आपला मोर्चा त्या गाडीसह पोलीस चौकीकडे वळवला. 'याद राखा त्याला जामिनावर सोडलात तर!' त्याचा समाचार त्यांनी जागेवरच घेतला होता. आता पोलिसांच्या ताब्यात देणे यापलीकडे त्यांना काही करणे शक्य नव्हते.

तर अशा या महाबळेश्वरच्या मोळीवाल्या बाया, एवढ्या त्या का खवळल्या होत्या? जे कारण घडलं होतं ते त्यांना नवीन नव्हतं. नेहमीच त्यांना तोंड द्यावं लागत होतं. नवीन गोष्ट होती ती त्यांनी निर्धारानं, एकीनं केलेली संघटना. त्या बळावरच आता त्यांनी जुन्या दुबळेपणाला झुगारून दिलं होतं. वारं अंगात आल्यासारख्या रेंजर आणि पोलिस अधिकाऱ्याच्या अंगावर त्या उसळून जात होत्या. नाहीतर एकटी दुकटीला गाठून छेड काढणे, दम देणे, लाच घेणे, प्रसंगी बलात्कार करणे व हे सर्व मुकाट्याने पोटासाठी सहन करणे ही तर नेहमीचीच गोष्ट होती.

पोटासाठी झालं म्हणून काय झालं! सगळीकडनं कोंडी झाली की कधी तरी स्फोट होणारच. आणि तसंच झालं. गार्डांच्या, अधिकाऱ्यांच्या जाचाला त्या अगदी विटून गेल्या होत्या— पोट भरण्यासाठी दुसरा काहीच मार्ग नव्हता. ५–६ मैल चढउताराची वाट तुडवून जंगलातनं जेमतेम एक नाहीतर दोन मोळ्या आणायच्या—तब्बल ५ ते ६ तास जीवघेणी खटपट करून त्या मोळ्या बाजारात आणायच्या. एका मोळीची किंमत काय तर खच्चून १॥ नाहीतर २ रुपये. २४ तास कोसळणाऱ्या पावसात सुद्धा निसरड्या वाटेवर ठायी ठायी मरण चुकवून या बाया मोळ्या आणतात! कारण तर काहीच दुसरे काम कोणाला मिळत नाही. पुरुष मंडळींनाही घरात बसावे लागते. खायचे काय? जगण्यासाठी ही अशी जीव घेणी रेस त्याना धावावी लागते.

बर ते मोळीचे पैसे तरी निच्चळ हातात येतात का? त्या ४–५ रुपयालाही अनेक मुंगळे डसलेले! वाळक्या लाकडात एखादी ओली चीब जरी दिसली तरी "टाक मोळी खाली. भर दंड!" मोळी त्याच्या घरी आणि बाईला दंडाचा भुर्दंड. त्या दिवशी थंडगार हवा खाऊन आणि पाणी पिऊन झोपायचे! थंड पाण्याने का कुठे भुकेची आग शमते!

वाळलेले फाटे काढताना म्हणे कोयता वापरायचा नाही. पाहिजे तर हात तोलवटू देत! तो दिसला की दंड आणि १५ रुपयांचा कोयता जप्त. दंड भरा व सोडवून घ्या. त्या दिवशीची मोळी त्या अधिकाऱ्याची. पुन्हा त्या घनदाट रानात एकटीला गाठून गरिबांच्या अब्रूचा लिलाव करायला याना काय लायसेन्स लागते! तो तर धनदांडग्याचा जन्म सिद्ध हक्क !

ही सगळी त्यांची परवड त्यांच्या भगिनीबंदानी न्याहाळली. ज्या मंत्रान त्यांनी जरब बसविली होती तो मंत्र दिला. या भगिनी कोण ? महाबळेश्वरच्या सौंदर्याची देखभाल करणाऱ्या पण ४ महिने (पावसाळचाचे) पगार नसल्याकारणाने पोटभर पाणी पिऊन दिवस काढणाऱ्या म्युनिसीपालिटीच्या कामगार स्त्रिया. समदुःखी बहिणी. त्याना साथ सरकारी गृह केंद्रावर २० वर्षे राबून कायम न झालेल्या बाया. ८ महिने असो, ८ महिने असो, नाहीतर बारमाही असो शेवटी ही कामं कष्टकऱ्यांचीच ! त्यांच्या जगण्यामरण्याची कदर न करता तुम्ही त्यांच्या कष्टाचा, श्रमाचा हिशेब मांडू लागलात की त्यांनाही आपल्या जुटीचा हिशेब मांडून 'चूक भूल द्यावी व घ्यावी ' व्यवहार करावा लागतो.

४०० मोळीवाल्या स्त्रियांनी मोर्चा काढला. मागण्या केल्या. कुठेतरी कोपऱ्यात फाटक्या वस्त्रात वावरणाऱ्या या बायांनी रेंजरला जागे केले. लायसेन्स द्यावे, कोयता वाळगण्यास परवानगी मिळावी, छेडछाड अत्याचार बंद व्हावे वगैरे. आता त्या मुकाटचाने काही सहन करणार नाहीत. त्यांची जूट झाली आहे. त्यांनी संघटना केली आहे.

जणू त्यांच्या या एकीची सत्परिक्षा जवळ सारखा तो प्रसंग घडला.

डिसेंबर ८ तारखेला एक सभा झाली. बायजाच्या प्र निधीनी या बायांची भेट घेऊन चर्चा केली. अन्याया प्रतिकार करायचा, अन्यायाला वाचा फोडायची ठरवून त्या उठल्या. घरी गेल्या तर कळले एका आपल्या एका पोरीवर बलात्कार केला. १० बाय होते. कडाक्याची थंडी ! पण त्या पेटून उठल्या. पु सगळ्या भरभरा एकत्र झाल्या आणि त्या गाडी ताब्यात घेतले आणि पुढचे महाभारत घडवले. एर नशिबाला बोल लावून त्या मुकाटचाने बसल्या असत्या

तर अशी ही महाबळेश्वरच्या मूळ रहिवाशी परवड. जगण्याची साधनं फार कमी. पूर्वी महाब श्वरच्या लोखंड मिश्रित मातीतून तवे, चिमटे, पळ तयार करीत. पण बाजारात कारखान्यातून येणाऱ्या वस्तूमुळे तो धंदा बसला. हवा खायला येणारी श्रीम मंडळी तर कर्णाचे अवतारच ! दहा रुपडचात महिन्या तीस दिवस आठ-आठ तास राबावे म्हणतात ! एर चैनीत मात्र ते दिवसाला हजार रुपयेही खर्च करतात

✻

---

## 'आयत्या बिळावर नागोबा'

देवनाहल्ली हे हुन्सूर तालुक्यातले गाव. अगदी देवराज अरसांचे परसदारच म्हणाना ! म्हैसूरहून ४० मैलावर. रामय्या चांभाराने सर्वे नं. ७ चे ४ एकराचे जंगल साफ करून तो स्वतः तिथे जमीन कसू लागला. काही वर्षापूर्वी वेंकटगिरी गौडा ह्या गोरगहल्लीच्या मोठ्या सावकाराने रामय्याला ती जमीन सोडून जायला सांगितले. जंगल सफा केले होते रामय्याने ! त्याने जमीन परत करायला नकार दिला. गौडाचा ससेमिरा लागला रामय्याच्या पाठी. त्याने हुन्सूर तालुक्याच्या पोलिस कमिशनरकडेही तक्रार नोंदवली. पोलिस कमिशनरने तहसिलदारास जमीनीचा कायदेशीर ताबा रामय्याला द्यावा म्हणून शिफारसही केली ! पण प्रत्यक्षात काही घडले नाही. एके दिवशी रामय्याला गुंडांनी जबरदस्तीने लॉरीत टाकून नेले. त्याने गडबड केली तर कृष्णराजसागर धरणात फेकण्याची त्याला धमकावणीही दिली. १८ दिवसानंतरची गोष्ट. त्याची १८ वर्षाची मुलगी व १६ वर्षाचा मुलगा शिवेतच शेतावरून घरी आल्याचे लोकांनी पाहिले. ती दोघेही दुसऱ्या दिवशी उठलीच नाहीत – कधीच पुनः उठली नाहीत ! रामय्याला प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणामुळे देवनाहल्ली सोडून दूर राहावे लागले. परत येऊन पाहातो तो झोपडीही नाही–बायकामुलांचा पत्ताही नाही. गौडाने कालव्याच्या पाण्याने झोपडी वाहावून टाकली – कुटुंबाला निराधार बनवले ! रामय्याने वर तक्रार नेलीय पण गौडाने ती जमीन दोन हरिजनांकडून खरेदी केल्याचा पुरावा (!) दाखल केल्याने रामय्याचे कूप धनप्याचेच्या यशस्वी नव्हते. आता गौडा ती जमीन कसतो आहे. रामय्या मात्र रस्त्यावर चांभारी छोटे दुकान थाटून परिवार चालवतो आहे.

(इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली, १४ जानेवारी १९७८, पृ. ५१-५२)